## संक्षिप्त

### रोनाल्डोने मौन सोडले; माद्रिदसोबत राहणार

**माद्रिद :** जगातील सर्वात श्रीमंत फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो



रिअल माद्रिद क्लबला सोडचिठ्ठी देणार असल्याच्या चर्चा गेल्या महिन्यापासून सुरू आहेत. यावर इतके दिवस शांत राहणाऱ्या रोनाल्डोने मंगळवारी अखेर मौन सोडले आणि आपण रिअल माद्रिदसोबतच राहणार असल्याचे स्पष्ट केले. ''गेल्या मोसमात क्लबसोबत महत्त्वाच्या स्पर्धा जिंकल्या आणि वैयक्तिक पुरस्कारही मिळवले, अशी कामगिरी क्लबसोबत पुन्हा करण्यास उत्सुक आहे,'' असे मत रोनाल्डोने व्यक्त करून सर्व चर्चांना पूर्णविराम दिला.

### इंडियन सुपर लीगला अधिकृत मान्यता

**मुंबई :** इंडियन सुपर लीगला (आयएसएल) आशियाई फुटबॉल महासंघाने (एएफसी) अधिकृत मान्यता दिली असून लीगमधील विजेता संघ एएफसी चषक स्पर्धेत खेळणार आहे. अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) तसा प्रस्ताव एएफसीकडे ठेवला होता. मंगळवारी दोहा येथे पार पडलेल्या बैठकीत तो मान्य करण्यात आला. तसेच आय-लीग स्पर्धेतील विजेता संघ एएफसी चॅम्पियन्स लीगच्या बाद फेरीसाठी पात्र ठरणार आहे.

### हरिकृष्णाने अर्मेनियाच्या व्हॅगेनियनला रोखले

**बिएल (स्वित्झर्लंड) :** भारताचा ग्रॅण्डमास्टर पेंटाला हरिकृष्णाने बिएल बुद्धिबळ महोत्सवातील ग्रॅण्ड मास्टर स्पर्धेच्या पहिल्या फेरीत अर्मेनियाच्या ग्रॅण्ड मास्टर राफेल व्हॅगेनियनला बरोबरीत रोखले.

### हॉकी इंडिया लीगचे २०१९मध्ये पुनरागमन

**नवी दिल्ली :** हॉकी इंडिया लीगच्या पाच यशस्वी हंगामांनंतर पुढील वर्षी ही स्पर्धा न खेळविण्याचा निर्णय घेण्यात आला असून २०१९मध्ये या लीगचे पुनरागमन होईल, असे हॉकी इंडियाने मंगळवारी स्पष्ट केले. ''पाच वर्षांच्या यशस्वी आयोजनानंतर या लीगमध्ये काही बदल करण्यास आम्ही उत्सुक आहोत. हे बदल हॉकीच्या विकासासाठी महत्त्वाचे असतील आणि म्हणूनच २०१८मध्ये ही लीग खेळवण्यात येणार नाही. २०१९मध्ये नव्या स्वरूपात ही लीग खेळवली जाईल,'' असे हॉकी इंडिया लीगचे प्रमुख आणि हॉकी इंडियाचे सरचिटणीस मोह. मुश्ताक अहमद यांनी सांगितले.

### आर्या, हाविश, विधी, दिपीत यांना जेतेपद

**नागपूर :** १२ वर्षांखालील मुलींच्या एकेरीत ठाण्याच्या दुसऱ्या मानांकित आर्या सोंगाडकर व मुलांमध्ये मुंबई उपनगरच्या अग्रमानांकित हाविश असराणीने दुसऱ्या राज्यस्तरीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत जेतेपद पटकाविले. आर्याने उत्कृष्ट खेळीच्या जोरावर पुण्याच्या प्रिथा वर्टीकरला १५-१७, ११-९, ११-९, १२-१० असा पराभवाचा धक्का दिला. मुलांच्या अंतिम सामन्यात हाविशने मुंबईच्या चैतन्य अहुजाला ११-२, ११-७, ११-६ ने नमविले.

**इतर निकाल : उपकनिष्ठ गट – मुली :** विधी शहा (उपनगर) वि. वि. समृद्धी कुळकर्णी (सोलापूर) ११-९, ११-५, ११-६, ९-११, ११-७; **मुले :** दिपीत पाटील (ठाणे) वि. वि. मानव मेहता (उपनगर) ११-९, ११-१, ११-३, ११-५; **१० वर्षांखालील मुली :** देव्यानी देशपांडे (पुणे) वि. वि. जेनी वर्गसी (नागपूर) ११-७, ११-८, ५-११, ४-११, १४-१२; **मुले :** देव हिंगोरे (उपनगर) वि. वि. हृदय जैन (ठाणे) ५-११, ८-११, ११-८, ११-७, ११-९.

### राष्ट्रीय अॅथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा

**मुंबई :** रिलायन्स फाऊंडेशन युथ स्पोर्ट्सच्या माध्यमातून देशभरातील शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दुसऱ्या वर्षात पदार्पण करणाऱ्या युथ स्पोर्ट्सने यंदा अॅथलेटिक्स राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा घेण्याचे ठरवले आहे. या स्पर्धेत ३० शहरांमधील खेळाडू सहभागी होणार असून ऑगस्ट महिन्याच्या मध्यांतराला स्पर्धेला सुरुवात होणार आहे. इंडियन सुपर लीगमधील निवड प्रक्रियेत केरळा ब्लास्टर्स क्लबने युथ स्पोर्ट्समधील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक २१ वर्षीय अजित सिवनची निवड केली आहे.

# कुस्तीपटू खाशाबा जाधव यांच्या कांस्यपदकाचा लिलाव

## क्रीडा संकुलाच्या निधीसाठी कुटुंबीयांचा निर्णय

**क्रीडा प्रतिनिधी, पुणे**

**ऑलिम्पिक पदक** मिळवण्यासाठी प्रत्येक खेळाडू आयुष्यभर संघर्ष करीत असतो. हे पदक केवळ त्याच्यासाठी नव्हे, तर त्याच्या देशाकरिताही अतिशय अभिमानास्पद गोष्ट असते. मात्र आपल्या देशात पदक विजेत्यांची उपेक्षाच होत असते. त्याचा अभिनव पद्धतीने निषेध करण्यासाठी ऑलिम्पिक कुस्तीमध्ये कांस्यपदक मिळवणाऱ्या खाशाबा जाधव यांच्या कुटुंबीयांनी या पदकाचा लिलाव करण्याचे ठरवले आहे.

याबाबत खाशाबा यांचे पुत्र रणजीत जाधव म्हणाले, ''जळगाव येथे २००९ मध्ये खाशाबा जाधव करंडक कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी तत्कालीन क्रीडामंत्री दिलीप देशमुख यांनी खाशाबांचे जन्मगावी राष्ट्रीय दर्जाचे कुस्ती संकुल बांधण्याचे व तेथे अद्ययावत सुविधांनी युक्त अकादमी स्थापन करण्याची घोषणा केली. या संकुलासाठी योग्य जागा मिळत नसल्यामुळे आमच्या कुटुंबीयांनी कऱ्हाड-तासगाव रस्त्यावरील २२ गुंठे जागा दिली.



> खाशाबा यांनी १९५२ मध्ये हेलसिंकी येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत कुस्तीचे कांस्यपदक मिळवत भारताला पहिले वैयक्तिक पदक मिळवून दिले होते. खाशाबा यांचे १९८४ मध्ये निधन झाले. तोपर्यंत त्यांचा कधीही गौरव झाला नाही. त्यांच्या निधनानंतर १६ वर्षांनी त्यांना मरणोत्तर अर्जुन पुरस्कार देण्यात आला. आपल्या देशात ऑलिम्पिक पदक विजेत्यांचा योग्य मान राखला जात नाही.
>
> –रणजीत जाधव

सुरुवातीला ही जागा अयोग्य असल्याची टीका करण्यात आली. मात्र नंतर सार्वजनिक बांधकाम खात्याने ही जागा योग्य असल्याची शिफारस केली. २०१३ मध्ये या संकुलासाठी दीड कोटी रुपये मंजूर करण्यात आले. मात्र एवढ्या कमी खर्चात क्रीडा संकुल उभारणे शक्य नसल्यामुळे शासनाने काढलेल्या टेंडर नोटीसला प्रतिसाद आला नाही. त्यामुळे निधी मिळूनही हे संकुल अद्याप उभे राहिलेले नाही. संकुलासाठी अतिरिक्त निधी आम्ही खाशाबांचे पदक विकून उभारण्याचे ठरवले आहे. जर शासनाला हे संकुल उभे करावयाचे नसेल तर त्यांनी आमची जागा परत करावी.''

''राज्य शासनातर्फे १९९७ पासून खाशाबा जाधव चषक कुस्ती स्पर्धा आयोजित केली जात आहे. सुरुवातीला या स्पर्धेला राष्ट्रीय स्पर्धेचा दर्जा होता. त्यानंतर ही स्पर्धा राज्य स्तरावर आयोजित केली जाऊ लागली. २०१५ मध्ये या स्पर्धेच्या वेळी झालेल्या वादंगामुळे ही स्पर्धा बंद पडली आहे. याचाही निषेध करण्यासाठी आम्ही पदक विकायला काढले,'' असेही रणजीत यांनी सांगितले.

# तंदुरुस्ती आणि दुसरी फळी हीच यशाची गुरुकिल्ली

## प्रो कबड्डी लीगमधील प्रशिक्षकांचे मत

**प्रशांत केणी, मुंबई**

**तंदुरुस्ती आणि** दुसरी फळी हीच यशाची गुरुकिल्ली ठरेल, असे मत विविध संघांच्या प्रशिक्षकांनी शुक्रवारपासून सुरू होणाऱ्या पाचव्या हंगामाबाबत व्यक्त केले आहे. तीन महिने चालणाऱ्या यंदाच्या हंगामात १२ संघ १३०हून अधिक सामने खेळणार आहेत. सामन्यांच्या संख्येचे दडपण सर्वच संघांवर असले तरी त्या दृष्टीने त्यांनी आधीपासून तयारी सुरू केली आहे.

प्रो कबड्डीच्या साखळीमध्ये प्रत्येक संघाच्या वाट्याला २२ सामने येणार आहेत. यापैकी घरच्या मैदानावर प्रत्येक संघाला सात दिवसांत सहा सामने खेळावे लागणार आहेत, तर अन्यत्र १५ सामने खेळावे लागतील. याशिवाय ६ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत जयपूरला होणाऱ्या आंतरविभागीय विशेष प्रवेशिकांच्या टप्प्यात प्रत्येक संघाला आणखी एक सामना खेळावा लागणार आहे.

मुंबई आणि चेन्नई येथे २२ ते २८ ऑक्टोबर या दरम्यान बाद फेरीचे सामने होणार आहेत. 'अ' आणि 'ब' गटातून प्रत्येकी तीन संघ बाद फेरीसाठी पात्र ठरतील. त्यामुळे या टप्प्यात किमान एक आणि कमाल चार सामने खेळावे लागणार आहेत. त्यामुळे सहा संघांच्या सामन्यांची संख्या ही सरासरी २३ ते २६ पर्यंत वाढणार आहे.

''सामन्यांमध्ये पुरेसे अंतर असल्यामुळे त्याचा फारसा त्रास होणार नाही. या दृष्टीने दुसरी सक्षम फळीसुद्धा आमची तयार आहे. वारंवार खेळाडू बदलत राहावे लागणार आहेत,'' असे मत यू मुंबाचे प्रशिक्षक ई. भास्करन यांनी व्यक्त केले.



गुजरात फॉर्च्यूनजायंट्सचे खेळाडू सरावानंतर चर्चा करताना.



> कबड्डीपटू सर्वसामान्यपणे वर्षभर खेळाशी जोडलेले असतातच. परंतु यंदाची स्पर्धा अत्यंत आव्हानात्मक आहे. सामन्यांची संख्या बरीच आहे. घरच्या मैदानावर सात दिवसांत सहा सामने खेळावे लागणार आहेत, हेच सर्वात मोठे आव्हान असणार आहे. अन्य ठिकाणी मात्र पुरेशा प्रमाणात विश्रांती मिळणार आहे. तंदुरुस्ती हा कबड्डी खेळाचा आत्मा आहे. आमच्या संघात अनुभवी आणि गुणवान खेळाडूंचा विशेष भरणा आहे. सामन्यांची संख्या बरीच असल्यामुळे बंगाल संघाचे शिबीर आधीपासूनच सुरू केले. पहिल्या दोन आठवड्यांच्या शिबिरात आम्ही तंदुरुस्तीवरच लक्ष केंद्रित केले. दुसरे शिबीर अद्याप सुरू असून, यात कौशल्यावर भर दिला जात आहे. संघरचना आणि दुसरी फळी कशी तयार करता येईल, हे यात प्राधान्याने लक्ष देण्यात आले. साहाय्यक प्रशिक्षकांची संपूर्ण फळी बदलण्यात आली आहे.
>
> – जगदीश कुंबळे, बंगाल वॉरियर्सचे प्रशिक्षक



> सामन्यांची संख्या अधिक असल्यामुळे आम्ही सरावासाठी योग्य रणनीती वापरली आहे. तंदुरुस्ती आणि अन्य सराव यांच्यावरच खेळाडूंनी आता योजनापूर्वक लक्ष केंद्रित केले आहे. हंगाम मोठा असल्यामुळे स्वाभाविकपणे दुखापतीचे व्यवस्थापन हे महत्त्वाचे असणार आहे. आमची दुसरी फळीसुद्धा अतिशय मजबूत आहे. या फळीतसुद्धा तितक्याच ताकदीचे खेळाडू आहे, ही संघाची जमेची बाजू ठरेल. त्यामुळे सामन्यांच्या संख्येनुसार खेळाडूंचे योग्य पद्धतीने व्यवस्थापन केले जाईल.
>
> – उदय कुमार, यूपी योद्धा प्रशिक्षक

# पुरुष व महिलांची जागतिक बॉक्सिंग स्पर्धा भारतात

**पीटीआय, नवी दिल्ली**

**'आंधळा मागतो** एक डोळा, पण देव देतो दोन' असाच अनुभव येथे पाहायला मिळत आहे. प्रतिमा उंचावण्यासाठी भारतीय बॉक्सिंग संघटकांनी जागतिक स्पर्धा आयोजित करण्याची मागणी केली होती; परंतु पुरुष व महिला या दोन्ही विभागांच्या जागतिक स्पर्धा आयोजित करण्याचा मान भारताला मिळाला आहे.

काही वर्षे अंतर्गत कलहामुळे भारतीय बॉक्सिंग क्षेत्राची प्रतिमा डागळली होती, मात्र आता या दोन्ही स्पर्धांच्या संयोजनपदाद्वारे या खेळात सकारात्मक वातावरण निर्माण होण्यास मदत होणार आहे. मॉस्को येथे नुकतीच आंतरराष्ट्रीय बॉक्सिंग महासंघाच्या (एआयबीए) कार्यकारिणीची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. महिलांची जागतिक अजिंक्यपद स्पर्धा पुढील वर्षी भारतात घेतली जाणार आहे. २०२१ मध्ये पुरुष गटाची जागतिक स्पर्धा आयोजित करण्याचा मान भारताला मिळाला आहे.

> ही खूप मोठी कामगिरी आहे. जर मी तंदुरुस्त असेन तर पुढच्या वर्षी जागतिक स्पर्धेतील ४८ किलो गटात सहभागी होण्यास मला निश्चित आवडेल. २००६ मधील जागतिक स्पर्धेच्या आठवणी माझ्यासाठी अजूनही ताज्या आहेत.
>
> – एम.सी. मेरी कोम, ऑलिम्पिक बॉक्सिंगपटू

मुंबईत १९९० मध्ये जागतिक चषक निमंत्रित स्पर्धा झाली होती, तर २०१० मध्ये नवी दिल्ली येथे राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा घेण्यात आली होती. या दोन स्पर्धांनंतर प्रथमच पुरुष गटाची एवढी मोठी स्पर्धा भारतात होणार आहे. महिलांची जागतिक स्पर्धा २००६ मध्ये भारताने आयोजित केली होती.

''जागतिक स्पर्धेच्या संयोजनाचा प्रस्ताव आम्ही योग्य रीतीने सादर केला होता. त्यामुळेच आम्हाला ही संधी मिळाली आहे,'' असे भारतीय बॉक्सिंग महासंघाचे अध्यक्ष अजय सिंग यांनी सांगितले.

# मुंबईला 'डब्लूटीए' टेनिस स्पर्धेचे यजमानपद

**नवी दिल्ली, पीटीआय**

**भारताला पाच** वर्षांनंतर पहिल्या डब्लूटीए महिला टेनिस स्पर्धेच्या यजमानपदाचा मान मिळाला असून ही स्पर्धा मुंबईत होणार असल्याचे मंगळवारी जाहीर करण्यात आले. या स्पर्धेच्या निमित्ताने जगातील अव्वल ५० टेनिसपटूंसोबत खेळण्याची संधी येत्या नोव्हेंबरमध्ये स्थानिक टेनिसपटूंना मिळणार आहे. ही स्पर्धा २० ते २६ नोव्हेंबर या कालावधीत सीसीआय येथे खेळविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटनेला पुन्हा एकदा महत्त्वाची आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेचे यजमानपद मिळविण्यात यश आले आहे. याआधी राज्य संघटनेने चेन्नई खुली स्पर्धेचे यजमानपद मिळवले असून ही स्पर्धा आता 'महाराष्ट्र खुली' या नावाने पुण्यात खेळवण्यात येणार आहे.

''अंकिता रैना, करमान कौश थंडी, ऋतुजा भोसलेसह राज्यातील इतर टेनिसपटूंना आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध खेळण्याचा अनुभव मिळणार आहे. खेळाडूंच्या हितासाठी आम्ही ही स्पर्धा मुंबईत खेळविण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे संघटनेचे सरचिटणीस सुंदर अय्यर यांनी सांगितले.

भारताने २०१२ साली रॉयल इंडियन खुल्या या डब्लूटीए स्पर्धेचे यजमानपद भूषवले होते. ही स्पर्धा पुण्यात पार पडली होती आणि त्यात एलिना स्व्हितोलिनाने जेतेपद पटकावले होते. या स्पर्धेसाठी चार थेट प्रवेशिका देण्यात येणार असून इतर खेळाडूंना पात्रता फेरीचा अडथळा पार करावा लागणार आहे. मात्र भारताची एकेरीतील अव्वल टेनिसपटू अंकिता रैना (२६२), करमान कौर थंडी (३४९) आणि राष्ट्रीय विजेती रिया भाटीया (५१९) यांना थेट प्रवेश मिळणे कठीण आहे. मात्र, नोव्हेंबर महिन्यांपर्यंत होणाऱ्या इतर स्पर्धेतील कामगिरीच्या जोरावर ते मुख्य फेरीतील प्रवेश मिळवू शकतील.

# भारतीय महिला टेनिसला सकारात्मक बदलांची गरज –सानिया

**पीटीआय, हैदराबाद**

**आपल्या देशात** करमान कौर व प्रार्थना ठोंबरे यांच्यासारख्या गुणवान खेळाडू आहेत. मात्र जागतिक क्षेत्राची तुलना केल्यास भारतीय महिला टेनिसमध्ये सकारात्मक बदल करण्याची गरज आहे, असे आंतरराष्ट्रीय टेनिसपटू सानिया मिर्झाने सांगितले.

''जागतिक क्रमवारीत ठोंबरे, कौर आदी भारतीय खेळाडू २०० ते २५० क्रमांकांमध्ये असतात. माझ्या दृष्टीने ही कामगिरी खूप चांगली नाही. या खेळाडूंनी आणखी प्रगती करण्याची आवश्यकता आहे. महिला टेनिस संघटकांनी आशावादी राहिले पाहिजे व सकारात्मक विचारधारणा ठेवीत प्रगती केली पाहिजे. त्यासाठी संघटकांनी प्रायोजक कसे वाचवता येतील याचा विचार केला पाहिजे,'' असे तिने सांगितले.

भारतीय महिला क्रिकेटपटूंचे कौतुक करीत सानिया म्हणाली, ''क्रिकेटसह अनेक खेळांमध्ये आपल्या देशातील महिला खेळाडूंनी लक्षवेधक कामगिरी केली आहे. महिला क्रिकेटपटूंनी अंतिम फेरीत स्थान मिळविल्यानंतरच प्रसारमाध्यमांचे त्यांच्याकडे लक्ष गेले. यापुढेही त्यांना अशीच चांगली प्रसिद्धी मिळेल अशी आशा आहे.''

# उसेन बोल्टवरच पुन्हा जमैकाची भिस्त

**पीटीआय, किंग्स्टन**

**ऑलिम्पिकमध्ये निर्विवाद** वर्चस्व गाजवणाऱ्या उसेन बोल्टसह जमैकाचे ५९ जणांचे पथक पुढील महिन्यात लंडन येथे होणाऱ्या जागतिक मैदानी स्पर्धेसाठी पाठवले जाणार आहे.

**जागतिक मैदानी स्पर्धा**

बोल्ट १०० मीटर धावणे, तसेच चार बाय १०० मीटर रिले शर्यतीत सहभागी होणार आहे. त्याच्याबरोबरच डॅनिली विल्यम्स व एलेनी थॉम्पसन यांच्यावरही त्यांची भिस्त आहे. ओमर मॅकलिओदने गतवर्षी ऑलिम्पिक स्पर्धेत ११० मीटर अडथळा शर्यतीत सुवर्णपदक जिंकले होते. त्यालाही जमैकाने संधी दिली आहे.

बीजिंग येथे दोन वर्षांपूर्वी जागतिक स्पर्धेत सुवर्णपदक मिळविणाऱ्या हॅन्सले पार्चमिन्ट, ओदायने रिचर्ड्स व शेरिका जॅक्सन यांच्याकडूनही जमैकाला सुवर्णपदकांची आशा आहे. थाळीफेकमध्ये जमैकाचा खेळाडू फेड्रिक्स दार्केस हा दुसऱ्यांदा जागतिक स्पर्धेचे प्रतिनिधित्व करीत आहे.

**दुखापतीमुळे रुदरफोर्डची माघार**

इंग्लंडच्या ग्रेग रुदरफोर्ड याने घोट्याच्या दुखापतीमुळे जागतिक स्पर्धेतून माघार घेतली आहे. तो लांब उडीत गतवेळचा विजेता खेळाडू आहे. त्याने २०१२मध्ये लंडन येथे झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेतही विजेतेपद मिळविले होते.

**सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड**
(क्रॉम्प्टन ग्रीव्हज् लिमिटेड पूर्वी)
सीआयएन: L99999MH1937PLC002641
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, सीजी हाऊस, डॉ. अॅनी बेझंट रोड, वरळी, मुंबई – 400 030
दुरध्वनी नं.: 022 – 24237777 फॅक्स नं: 022-24237545
ई-मेल: investorservices@cgglobal.com वेबसाईट: www.cgglobal.com

**सूचना**

सिक्युरिटीज अॅन्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सूचीकरण आबंधन आणि प्रकटन आवश्यकता) नियमन, २०१५ च्या नियमन ४७ च्या अनुरोधाने, ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, ३० जून, २०१७ रोजी संपलेल्या तिमाही अखेरचे अ-लेखापरीक्षित वित्तीय निकाल आणि वित्तीय वर्ष २०१७-२०१८ विभागवार वित्तीय अहवाल, स्वतंत्र तसेच एकत्रित अशा दोन्ही तत्त्वांवर, इतर व्यवसायासोबत, विचार आणि मंजूरी घेण्यासाठी कंपनीच्या संचालकीय मंडळाची बैठक ही शुक्रवार, ११ ऑगस्ट, २०१७ रोजी घेण्यात येईल.

सीजी पॉवर अॅण्ड इंडस्ट्रियल सोल्यूशन्स लिमिटेड करिता
मनोज कौल
एसीएस16902
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी
स्टॉक इक्सचेंजेसची वेबसाईट: www.bseindia.com/www.nseindia.com

स्थळ : मुंबई
दिनांक : २५ जुलै, २०१७

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**
**पाणीपुरवठा**

**निविदा सूचना क्र. ६/२०१७-१८**

आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कामाकरिता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत (सी.पी.डब्ल्यू.डी./ सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र शासन/ सिडको/ बृहन्मुंबई महानगरपालिका/ मजिप्रा. इत्यादी) कंत्राटदारांकडून निविदा मागवीत आहे.

कोरे निविदा फॉर्म व निविदेबाबत सर्व अटी व शर्तींची माहिती महाराष्ट्राचे www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक २६.७.२०१७ ते २.८.२०१७ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. निविदा ई-टेंडरिंग कार्यप्रणालीद्वारे दि. २.८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरता येतील. प्राप्त निविदा दिनांक ४.८.२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता शक्य झाल्यास उघडण्यात येईल.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे व त्यांचा निर्णय कायदेशीररीत्या सर्व निविदांसाठी बंधनकारक राहील.

निविदेबाबतची अधिक माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

कडोंमपा/जसंवि/मुका/४२९
दि. २५.७.२०१७

सही/-
**जल अभियंता**
कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

**KHADI & VILLAGE INDUSTRIES COMMISION**
Ministry of Micro, Small & Medium Enterprises, Govt. of India
**G.N.MULTI DISCIPLINARY TRAINING CENTER**
AGAR ROAD, P.O.DAHANU, DIST-PALGHAR (M.S), Pin No. 401601.
Phone/Fax-(02528) 222626, Email-gnmdtc@email.com, gnmdtcdahanu.kvic@gov.in

**EMPANELMENT TO ENGAGE THE LOCAL SKILL TRAINER (LST) AND PROFESSION TRAINING ASSOCIATE FOR FOLLOWING COURSES TO BE CONDUCTED AT TRAINING CENTER AND ALSO AT DISTRICT LEVEL**

• Motor Winding Course • Fruit & Vegetable Processing • Beautician Course • Electric Wiremen • Fancy Candle Making • Chalk Making • Rangoli Making /Sanskar Bharti • Computer & Hardware Courses • Phenyl Making • Carpentry • Four, two wheeler Maintenance • Fashion Designing • Paper Conversion • Basic Tailoring • Beekeeping • Mobile Repair • Data entry operator Course • Composite Rural Engg. • Warli Painting • Welder and Fabrication • Crochet - Crosia Handicrafts Making • Solar Energy Course • Palm Life Article • Artificial Jewellery

Apart from the above courses any other courses may be conducted with the approval of State Director/Principal.

Interested Technical Persons/Trainers may apply on plain paper giving details name, address, qualification, experience, contact No. and email etc. within 10 days from date of publication of this advertisement. To the Principal GNMDTC, Dahanu for further details please visit our website: www.kvic.org.in & also see the Circular No. C.B./S.D.P/ guidelines/ 2017-18 dated 27-06-2017.

Principal

**टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड**
एल्फिन्स्टन बिल्डिंग, १०, वीर नरिमन रोड, मुंबई - ४००००१.
टेलि. : ९१ २२ ६६६५ ८२८२ फॅक्स : ९१ २२ ६६६५ ७९१७ ई-मेल : ticl@tata.com
वेबसाइट : www.tatainvestment.com सीआयएन : एल६७२००एमएच१९३७पीएलसी००२६२२

प्रति,
टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडचे सदस्य :

याद्वारा **सूचना** देण्यात येते की -

(i) संचालक मंडळाच्या २४ मे, २०१७ रोजी घेण्यात आलेल्या त्यांच्या सभेमध्ये **प्रत्येकी रु. १० च्या सामान्य भागानुसार रु. १८ (१८०%) च्या लाभांशास** मंजुरी देण्यात आली आहे, ती आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कंपनीच्या भागधारकांच्या मान्यतेच्या विषयाधीन राहील.

(ii) २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरिता लाभांशाच्या प्रदानास हक्कदार असलेल्या सदस्यांची नावे निश्चित करण्याकरिता **कंपनीच्या सदस्यांची नोंदवही व भाग हस्तांतरण पुस्तिका मंगळवार, ०८ ऑगस्ट, २०१७** पासून ते **सोमवार, २१ ऑगस्ट, २०१७ (दोन्ही दिवस धरून)** पर्यंत बंद ठेवण्यात येईल. लाभांशाचे प्रदान, जर सभेमध्ये घोषित झालेले असल्यास, २३ ऑगस्ट, २०१७ रोजी किंवा नंतर करण्यात येईल.

(iii) टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेडची **ऐंशीवी वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार, २१ ऑगस्ट, २०१७ रोजी स. ११.०० वा.** रंगस्वर ऑडिटोरियम, वाय. बी. चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ भोसले मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०००२१ येथे घेण्यात येणार आहे.

संचालक मंडळाच्या आदेशाद्वारा,
**टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड**
**मनोज कुमार सी. व्ही.**
**मुख्य वित्तीय अधिकारी व कंपनी सचिव**

मुंबई, २५ जुलै, २०१७

TATA

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**
सामान्य प्रशासन विभाग,
जा. क्र. मनपा/आस्था/५८०/२०१७
दि. २५.०७.२०१७

**।। जाहीर सूचना ।।**

मिरा-भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील खालील नमूद केलेले कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकापासून गैरहजर आहेत.

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | दिनांकापासून गैरहजर |
|---|---|---|---|
| १. | श्री. गोपाल खंडवी | शिपाई | नोव्हें. २०११ |
| २. | श्री. सुनील चतुरे | शिपाई | मार्च २००९ |
| ३. | श्री. प्रशांत पी. पाटील | शिपाई | ऑक्टो. २०१२ |
| ४. | श्री. मोहन सोमा तळपे | स.का. | जून २०१२ |
| ५. | श्री. कळिकनंदन रामलिंगम | स.का. | जून २०१४ |
| ६. | श्री. संतोष सुरेश पवार | स.का. | सप्टें. २०१५ |
| ७. | श्री. भिकू हिरजी सोलंकी | स.का. | ऑगस्ट २०१० |
| ८. | श्री. पेरुमल तंगवेल | स.का. | ऑगस्ट २०१० |
| ९. | श्री. कृष्णनआरमुगम कोंडर | स.का. | एप्रिल २०१४ |
| १०. | श्री. मोहन सकरा सोलंकी | स.का. | जाने. २०१२ |
| ११. | श्रीमती वंदना वाकोडे | स.का. | नोव्हें. २००९ |
| १२. | श्री. सन्ना भा. सोलंकी | स.का. | नोव्हें. २००९ |
| १३. | श्री. अॅन्थोनी प्रभू लुद्रस्वामी | स.का. | ऑक्टो. २०१५ |
| १४. | श्री. शिवकुमार पी. वेल्यन | स.का. | मार्च २०११ |
| १५. | श्री. दिलबाग महेश्वरी | स.का. | जुलै २०११ |
| १६. | श्री. कन्नन गोपाळ | स.का. | मार्च २०१५ |
| १७. | श्री. राजू नंदलाल वैती | स.का. | सप्टें. २०१२ |
| १८. | श्री. प्रकाश जी. पाटील | स.का. | ऑक्टो. २०१४ |
| १९. | श्री. सतीश डोनावरे | स.का. | एप्रिल २००८ |
| २०. | श्री. सुरेश एस. सोनकांबळे | स.का. | ऑगस्ट २००८ |
| २१. | श्री. सतीश आरोटे | यंत्रचालक | जुलै २०११ |

वरील कर्मचारी यांना महानगरपालिकेकडून कारणे दाखवा नोटिसा देऊनही कोणत्याही प्रकारचा खुलासा प्राप्त झाला नाही. तरी वरील सर्व कर्मचारी यांना या नोटिसीद्वारे अंतिमरीत्या कळविण्यात येते की, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत खुलाशासह निम्नस्वाक्षरीसमोर हजर राहावे. विहित मुदतीत हजर न झाल्यास आपले काहीच म्हणणे नाही, असे समजून महानगरपालिकेकडून एकतर्फी कारवाई केली जाईल. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमच्या कलम ५६ नुसार प्राप्त शक्तींचा वापर करून सेवेतून बडतर्फ करण्यात येईल. त्यानंतर कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार किंवा निवेदन विचारात घेतले जाणार नाही, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

जा.क्र. मनपा/जनसंपर्क/जाहिरात/
२०६/२०१७-१८ दि. २५.०७.२०१७

स्वाक्षरी/-
**(विजयकुमार म्हसाळ)**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. लोकसत्ता कार्यालय : एक्स्प्रेस टॉवर्स, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४००००, फॅक्स : २२८२२१८७. महापे कार्यालय : प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. पुणे कार्यालय :एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. नागपूर कार्यालय : १९, ग्रेट नाग रोड, उंटखाना, नागपूर -४४० ००९. दूरध्वनी : ०७१२-२७०६९१७/२७०६८९७ ■ अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका ■ कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार ■ संपादक : गिरीश कुबेर * (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.)
R. N. I. Reg. No. 1591/57 © द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई. ■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.